पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८,
कामगार कल्याण विभाग
जा. क्र. काक/३/कावि/३५०/२०१९
दिनांक -०९/०८/२०१९

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय** – कंत्राटी कामगार / शिकाऊ उमेदवारांचे (Apprentice Act 1961) किमान वेतन दराबाबत.

**संदर्भ** – १. मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दिनांक २८/०६/२०१८
२. काक/३/कावि/११७/२०१९ दिनांक २०/०२/२०१९
३. मा. कामगार आयुक्त (ग्रा.वि.) मुंबई यांचेकडील क्र.ग्र.वि/ कि.वे.अ./वि.भ./२०१९-२/कार्या-१० दिनांक ०५/०८/२०१९

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भिय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटदारामार्फत नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांचे दिनांक ०१/०४/२०१८ पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित करणेत आले आहे. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्यांकरीता प्रसिध्द होणा-या विशेष भत्त्याचे दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे व त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी किमान वेतन दराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार संदर्भिय क्र. २ अन्वये दिनांक ०१/०१/२०१९ ते ३०/०६/२०१९ या कालावधीचे दर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

उक्त संदर्भिय क्र. ३ अन्वये दिनांक ०१/०७/२०१९ ते ३१/१२/२०१९ या कालावधीतील विशेष भत्त्याचे दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू

(प्रमोद जगताप)
**कामगार कल्याण अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८ .

C:\Users\admin\Desktop\vbk\vbk\Kiman Vetan Rate -01-01-19 - 31-06-19.docx

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**कामगार कल्याण विभाग**

कुशल / अर्धकुशल / अकुशल व सफाई कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे

(कालावधी - दिनांक ०१/०७/२०१९ ते ३१/१२/२०१९)

मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दिनांक २८ जून २०१८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून

जा. क्र. काक/३/कावि/३८०/२०१९ दिनांक ०८/०८/२०१९ चे लगत

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ४,७६०.०० | १८,७६०.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ४,७६०.०० | १७,७६०.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ४,७६०.०० | १६,२६०.०० |

**कामाचे स्वरुप – सफाई कामकाज**

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | सफाई कामगार | १०,०००.०० | २,६१८.०० | १२,६१८.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील.

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ. (१ + २ यावर) | १३% |
| ३ | ई.एस.आय. (१ + २ + घरभाडे ५% यावर) | ३.२५% |
| ४ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% |
| ५ | रजा वेतन (१ + २ यावर) | ५.७७% |
| ६ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | रु. ६/- |
| ७ | सेवा शुल्क (१ + २ यावर)<br>अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

**कामाचे स्वरुप - शिकाऊ उमेदवार विद्यावेतन**

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | शिकाऊ उमेदवार (Apprentice Act 1961) | १३,०००.०० | ४,७६०.०० | १७,७६०.०० |

Apprentice Act 1961 अंतर्गत नेमणूक केलेल्या शिकाऊ उमेदवारांना Ministry Of Labour & Employment यांचेकडील Notification No. G.S.R. 680(E) Dated 22nd September, 2014 नुसार अर्धकुशल कामगारांचे दर लागु राहतील. त्यानुसार शिकाऊ उमेदवारांना अर्धकुशल कामगारांचे वर नमूद केलेल्या दराप्रमाणे (मूळ वेतन + विशेष भत्ता) या एकत्रित रक्कमेवर प्रशासन विभाग, मुख्य कार्यालयामार्फत निश्चित केलेल्या धोरणानुसार विद्यावेतन देय राहील.

तसेच Notification No. G.S.R. 423 (E) Dated 13th June 2019, नुसार ESI वर्गणी मालकाचा हिस्सा ४.७५% ऐवजी ३.२५% व कामगारांचा हिस्सा १.७५% ऐवजी ०.७५% इतका करण्यात आलेला आहे. त्यामुळे ESI चे दर (मालकाचा हिस्सा) दिनांक ०१/०७/२०१९ पासुन ४.७५% ऐवजी ३.२५% प्रमाणे अदा करणे आवश्यक आहे.

(प्रमोद जगताप)
**कामगार कल्याण अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

C:\Users\admin\Desktop\vbk\vbk\Kiman Vetan Rate -01-01-19 - 31-06-19.docx